भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/११/२०१७

१)शेतातील धानाचे भारे जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक १४+१५/११/२०१७ चे ००.०० वाजता. ते ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कृष्णा सखाराम शहारे वय ६५ वर्ष, रा. चिचाळ टोली याचे पारडी रयतवाडी व चिचाळ शिवारात असलेल्या ३.५ एकर मधील धान कापणी करुन शेतात धानाची गंजी करुन मळणी करीता ठेवलेले असता शेतातील .धानाचे भारे कोणीतरी अज्ञात आरोपीने जाळुन अंदाजे ७५ पोते धानाचे किंमती ७५,०००/–रु. ची नुकसान केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४३५ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. गभणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

२) सिसीटीव्ही कॅमेऱ्याची चोरी .:–

दिनांक १४/११/२०१७ चे १८.१५ ते १५/११/२०१७ चे ०८.३० वाजता. दरम्यान यातील मातोश्री विद्या मंदीर तुमसर येथील शाळेच्या खुल्या कमऱ्यामध्ये लावलेले चार सिसीटीव्ही कॅमेरे ई व्हाक कंपनीचे किंमती १४,०००/–रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी किशोर नत्थुजी पेटकर वय ५२ वर्ष, रा. तुमसर यांचे लेखी तक्रारी वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. बावणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

३) अज्ञात वाहन चालकाने इसमास धडक देवुन गंभिर जखमी होवुन उपचारा दरम्यान मरण पावल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक १३/११/२०१७ चे १०.३० वाजता. दरम्यान यातील मृतक गोपाल बालकृष्ण भुसारी वय ३३ वर्ष, रा. पेट्रोलपंप ठाणा यास कोणत्यातरी अज्ञात आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन मृतकास पेट्रोलपंप ठाणा येथे धडक मारुन त्यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक १३/११/२०१७ चे १७.४० वाजता मरण पावल्याने पोस्टे भंडारा मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरुन सरतर्फे पोहवा. साकुरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३०४(अ) अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उप.नी. ताराम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) चारचाकी गाडीची चोरी :– .**

दिनांक १५/११/२०१७ चे ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अंकीत दिलीप ठोसरे वय २७ वर्ष, रा. जांब याची गाडी आयसर चारचाकी क्र. एमएच ३६/३६०२ ही खुल्या जागेत ठेवली असता त्यामधील अंदाजे ३० लिटर डिजेल किंमती १८००/–रु. चे यातील आरोपीने रात्रीचे वेळी कुणीही नसल्याची संधी साधुन चोरी करुन आरोपी क्र २ ला विकल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो लीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३७९,४११,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उप.नी. इंगळे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**५) मोटार पंपची चोरी :– .**

दिनांक १४/११/२०१७ चे २२.०१ ते १५/११/२०१७ चे ०१.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी अतुल उकराम कोहपरे वय ५८ वर्ष, रा. पवनी याचे घराचे कम्पाउंन्ट वालचे आत एक होन्डा कंपनीची ०३ हार्स पावरची मोटार पंप किंमती ९,०००/–रु. ची यातील अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने करुन आरोपी क्र २ ला विकल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स. फौ. खोंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**६) अल्पवयीन मुलीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :– .**

दिनांक १५/११/२०१७ चे १७.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे घरी एकटीच घरी असता आरोपी हे फिर्यादीचे घरा समोर येवुन आरोपी क्र. १ ने अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व आरोपी क्र. २ ने फिर्यादीस चपलाने मारुन शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,३५५,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो. हवा. परतेती पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

७) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :—

दिनांक १५/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, कारधा, करडी तुमसर व पवनी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४९ लिटर हातभट्टी दारू किंमती ४१५०/—रूपया चा माल तसेच ७० लिटर २०० मिली लिटर देशी/ विदेशी + सेन्ट्रो कार ६०६१८/—रु. असा एकुण किंमती ६४,७६७/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(मपोउपनी. माया चाटसे)
**माहिती कक्ष भंडारा**
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.